(इंग्रजीत टंकलिखित  न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

## मुंबई उच्च न्यायालय

## औरंगाबाद खंडपीठ

## फौजदारी अर्ज क्र. १६८८/२०२०

१ मोईझ अहमद पुत्र अब्दुल रझाक,

वयः ४५ वर्षे, कामधंदा- व्यवसाय ,

राहणार उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड

२ . मोहम्मद. समीर पुत्र मोईझ अहमद,

वयः २० वर्षे, कामधंदा- व्यवसाय ,

राहणार वर सांगितल्याप्रमाणे. अर्जदार

( मूळ आरोपी क्रमांक २ आणि ३ )

**- विरुद्ध -**

१ . महाराष्ट्र राज्य

पोलीस ठाणे नांदेड यांच्या माध्यमातून

२ . एक्स. वाय. झेड ..उत्तरवादी

( उत्तरवादी क्रमांक २ मूळ तक्रारदार )

अर्जदारांसाठी वकीलः श्री. बी. एन. गडेगावकर

उत्तरवादी क्रमांक १ राज्य यांच्याकरिता ए. पी. पी. : श्री. एस. ए. गायकवाड

उत्तरवादी क्रमांक २ यांच्याकरिता : श्री. जे. एम. मुरकुटे

न्यायमंच : श्रीमती . विभा कंकणवाडी आणि

रोहित. डब्ल्यू. जोशी, न्या. न्या.

दिनांक : डिसेंबर ६, २०२४.

**न्यायनिर्णय ( न्या. रोहित डब्ल्यू. जोशी यांच्याद्वारे )**

१ . सध्याच्या प्रकरणातील अर्जदार हे आर. सी. सी. क्रमांक ६८१/२०२१ मधील आरोपी क्रमांक २ आणि ३ आहेत, जे विद्वान अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय क्रमांक ४ नांदेड यांच्याकडे प्रलंबित आहेत.भारतीय दंड संहितेच्या (यानंतर संक्षिप्ततेसाठी 'आय. पी. सी.' म्हणून संबोधले जाईल ) कलम ३५४, ३५४-सी , ५०६ सह कलम ३४ अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठी नांदेड जिल्हा पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या प्रथम खबरी अहवालानुसार, सदर फौजदारी गुन्हा हा गुन्हा क्र. ००५६० /२०२० दिनांक २३.०७.२०२० अन्वये नोंदवण्यात आला आहे. उक्त प्रथम खबरी अहवाल दाखल केल्यानंतर, पोलीस प्राधिकरणाने या प्रकरणाचा तपास केला आहे आणि दोषारोपपत्र क्रमांक २४१/२०२१ दिनांक १९.०६.२०२१ अन्वये विद्वान दंडाधिकारी यांच्यासमोर

अंतिम अहवाल दाखल केला आहे. सुरुवातीला, सध्याचा प्रथम खबरी अहवाल सध्याच्या अर्जदारांविरुद्ध दाखल करण्यात आला होता. तथापि, तपासादरम्यान एक व्यक्ती ज्याचे नाव मोहम्मद. सारोअर पुत्र अब्दुल गफार याला आरोपी क्रमांक १ करण्यात आले आणि विद्यमान अर्जदारांना आरोपी क्रमांक २ आणि ३ करण्यात आले आहे. उत्तरवादी क्रमांक २ माहिती देणारी आहे. प्रथम खबरी अहवालातील मजकूर लक्षात घेऊन, तिची ओळख सुरक्षित ठेवण्यासाठी आम्ही तिचे नाव लपवण्यास प्राधान्य देतो. सध्याचा अर्ज दाखल केल्यानंतर, नांदेडच्या ५ व्या अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी यांनी दिनांक २४.०९.२०२१ रोजी प्रदर्श २० द्वारे आरोप निश्चित केले आहे. त्याची प्रत अर्जदारांसाठी असलेल्या विद्वान वकिलांनी अभिलेखावर सादर केली. ती अभिलेखावर घेण्यात आली आणि ओळख पटविण्यासाठी प्रदर्श 'अ' म्हणून चिन्हांकित केली जाते.

२. उत्तरवादी क्रमांक २ हिने एफ. आय. आर. मध्ये म्हटले आहे की तिचे पती सेल फोन कंपन्यांसाठी टॉवर्स उभारण्याचे काम करतात. तिने नमूद केले आहे की प्रथम खबरी अहवाल दाखल होण्याच्या सुमारे दीड वर्षांपूर्वी, तिच्या पतीचा त्याच्या भाडेकरू मोईझ अहमद पुत्र अब्दुल रझाक (अर्जदार क्रमांक १ ) याच्याशी टॉवर्स उभारण्याच्या कामासंबंधी वाद झाला होता आणि त्यामुळे हे काम प्रलंबित राहिले.

३ .  तिने म्हटले आहे की दिनांक १३.०१.२०२० रोजी कुटुंबातील काही वादामुळे ते त्यांचे निवासी घर सोडून भाडेकरू मोईझ अहमदच्या घराला लागून असलेल्या मलंग बाबा इमारतीसमोर असलेल्या टिनच्या शेडमध्ये झोपायला गेले. तिचा असा आरोप आहे की ते पती-पत्नी म्हणून एकत्र झोपत असताना लैंगिक संबंध प्रथापित करण्याचा विचार करत असताना , मोईझ अहमद (अर्जदार क्रमांक १ ) नावाच्या या भाडेकरूचा साळा (पत्नीचा भाऊ) असलेल्या सारोअरने टीन शेडचे एक टिन हलवले आणि उत्तरवादी क्रमांक २ चे तिच्या पतीसोबतचे व्हिडिओ क्लिप रेकॉर्ड केले . उक्त सारोअरने उत्तरवादी क्रमांक २ च्या पतीला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, जेव्हा त्यांच्या लग्नाचा पुरावा त्याला दाखवण्यात आला, तेव्हा तो तेथून निघून गेला. ती असे सादर करते की दिनांक २२.०७.२०२० रोजी संध्याकाळी सुमारे ४ वाजता मोबाईल टॉवरच्या उभारणीसंबंधीच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी परिसरातील लोकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत अर्जदार क्रमांक १ आणि त्याचा मुलगा अर्जदार क्रमांक २ यांनी मोहम्मद सारोअरने रेकॉर्ड केलेली व्हिडिओ क्लिप सर्व व्यक्तींसमोर दाखवली.

४ .  या तक्रारीच्या आधारे, कलम ३५४ ,३५४ -सी, ५०६ सह कलम ३४ अंतर्गत दंडनीय गुन्हा विद्यमान अर्जदारांविरुद्ध नोंदवला गेला.

५.  वर नमूद केल्याप्रमाणे तपास पूर्ण झाल्यानंतर मोहम्मद सारोअरचे नाव आरोपी क्रमांक १ म्हणून वाढविण्यात आले आणि विद्यमान अर्जदारांना आरोपी क्रमांक २ आणि ३ म्हणून जोडण्यात आले . या अंतिम अहवालामुळे आर. सी. सी. क्रमांक ६८१ /२०२१ नोंदविण्यात आले आहे , जे ५ व्या अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी (येथे संक्षिप्ततेसाठी '५ वे ए. सी. जे. एम ' म्हणून संदर्भित) यांच्या अभिलेखावर प्रलंबित आहे . वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणात, दिनांक २४.०९.२०२१ रोजी आरोप हा प्रदर्श २० अन्वये निश्चित करण्यात आला आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत दाखल केलेल्या सध्याच्या अर्जाद्वारे, अर्जदार/आरोपी क्रमांक २ आणि ३ यांनी उक्त प्रथम खबरी अहवाल रद्दबातल करण्याची प्रार्थना केली आहे. दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर आणि फौजदारी खटल्याची नोंदणी केल्यानंतर, त्यांनी दिनांक १९.०६.२०२१ रोजीचे दोषारोपपत्र क्रमांक २४१ /२०२१ आणि नियमित फौजदारी प्रकरण क्रमांक ६८१/२०२१ यांना आव्हान देण्यासाठी अर्जात सुधारणा केली आहे.

६.  अर्जदारांच्या विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला आहे की दोषारोपपत्रातील संपूर्ण दाखले खरे आणि योग्य म्हणून स्वीकारले तरीही कलम ३५४ आणि ३५४ -सी चे घटक सिद्ध होत नाहीत.ते असे सादर करतात की आय. पी. सी. च्या कलम ३५४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या महिलेच्या विनयभंग करण्याच्या गुन्ह्याची दखल केवळ अशा प्रकरणातच घेतली जाईल जिथे कोणत्याही महिलेवर तिच्या विनयभंग करण्याच्या

हेतूने हल्ला केला जातो किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केला जातो . हल्ला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग वापर करण्याबाबत कोणताही आरोप नाही, असे ते सादर करतात . त्यांच्या मते, बैठकीत व्हिडिओ क्लिप प्रदर्शित करण्याच्या कृतीमुळे कलम ३५४ आणि आयपीसीच्या ३५४-सी चे आवश्यक घटक लागू होणार नाहीत. ते पुढे म्हणतात की आय. पी. सी. चे कलम ५०६ हा अदखली गुन्हा आहे. दखलपात्र कलमांखालील गुन्हा सिद्ध होत नसल्यामुळे, एफ. आय. आर. आणि परिणामी दोषारोपपत्र आणि फौजदारी खटला सध्याच्या अर्जदारांविरुद्ध रद्दबातल केला जाऊ शकतो, असे सांगणाऱ्या निवेदनाचा सारांश ते देतात.

७ . याउलट, श्री. एस. ए. गायकवाड, विद्वान ए. पी. पी. यांनी सादर केले की पती-पत्नी म्हणून खाजगी लैंगिक संबंध स्थापित होण्यापूर्वी एक पुरुष आणि स्त्री एकत्र असल्याची व्हिडिओ क्लिप प्रसारित करून उत्तरवादी क्रमांक २ आणि ३ यांनी केलेले कृत हा एक घृणास्पद गुन्हा आहे. ते सादर करतात की आय. पी. सी. च्या कलम ३५४ -सी चे घटक निश्चितच लागू होत आहेत आणि त्यामुळे अर्जदारांविरुद्ध एफ. आय. आर. आणि परिणामी फौजदारी खटला रद्दबातल केला जाऊ शकत नाही. ते पुढे असे सादर करु शकतात की सदर कार्यवाहीत हजर असलेले विद्वान सरकारी वकील तसेच विद्वान दंडाधिकारी देखील आय. पी. सी. आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम , २०००

(संक्षिप्ततेसाठी 'आय. टी. अधिनियम' म्हणून संदर्भित) च्या इतर काही तरतुदींची दखल घेण्यास हुकले आहेत. त्यांनी आय. पी. सी. चे कलम २९२ आणि आय. टी. अधिनियमाच्या कलम ६६ -ई आणि ६७ च्या तरतुदींकडे आमचे लक्ष वेधले आहे. विद्वान ए. पी. पी. यांनी तपासादरम्यान नोंदवलेल्या साक्षीदारांच्या जबाबांकडे आमचे लक्ष वेधले आहे जे मोठ्या संख्येने लोक उपस्थित असलेल्या बैठकीदरम्यान व्हिडिओ क्लिपच्या प्रदर्शनाच्या वस्तुस्थितीची पुष्टी करतात. उत्तरवादी क्रमांक २ यांचे विद्वान वकील जे. एम. मुरकुटे यांनी अशाच प्रकारचे निवेदन सादर केले आहे. ते पुढे म्हणतात की, आक्षेपित व्हिडिओ क्लिप रेकॉर्ड केल्याबद्दल आरोपी क्रमांक १ विरुद्ध कलम ३५४ -सी अंतर्गत आरोप निश्चित केला गेला असेल, तर तो व्हिडिओ क्लिप प्रसारित करणाऱ्या विद्यमान अर्जदारांविरुद्धही निश्चितपणे दाखल करायला हवा होता.

८. आय. पी. सी. च्या कलम ३५४ अंतर्गत गुन्हा सिद्ध होत नाही, या अर्जदारांच्या विद्वान वकिलाच्या निवेदनाशी आम्ही सहमत आहोत. कलम ३५४ हे कोण्या व्यक्तीनी कोणत्याही स्त्रीवर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोगाचा वापर केला आणि तिचा विनयभंग करण्याचा त्यामागे उद्देश असेल किंवा त्यामुळे तिचा विनयभंग होण्याचा संभव होण्याची जाणीव आहे याबाबत आहे. आय. पी. सी. चे कलम ३५४ लागू करण्यासाठी फौजदारी बलप्रयोगाचा वापर किंवा हमल्याचे कृत्य हे आवश्यक पूर्वावश्यकता आहे. 'बलप्रयोग ' आणि 'फौजदारीपात्र बलप्रयोग' या संज्ञा आय. पी.

सी. च्या अनुक्रमे कलम ३४९ आणि ३५० अंतर्गत परिभाषित केल्या आहेत. कलम ३४९ मध्ये असे म्हटले आहे की एखाद्याने जर अन्य व्यक्तीच्या ठायी किंवा त्या वक्तीच्या संपर्कात येणाऱ्या कोणत्याची वस्तूशी शारीरिक सामर्थ्य वापरून किंवा वस्तुंनी किंवा कोणत्याही प्राण्याला प्रवृत्त करून गती निर्माण केली किंवा गतीबद्दल किंवा गतिविराम घडवून आणला तर तो त्याबाबतीत बलप्रयोग करतो असे म्हंटले जाईल. जेव्हा बलप्रयोग केलेल्या व्यक्तीच्या संमतीशिवाय बळाचा वापर केला जातो आणि त्यामुळे क्षती होण्याचा, भीती वाटावी किंवा त्रास होतो किंवा होऊ शकतो तेव्हा आयपीसीच्या कलम ३५४ नुसार सदर बलप्रयोग हा फौजदारीपात्र बलप्रयोग होतो. त्याचप्रमाणे आय. पी. सी. च्या कलम ३५१ अंतर्गत परिभाषित केलेल्या हमला या शब्दाचा अर्थ असा आहे की कोणतेही हावभाव किंवा तयारी ज्यामुळे उपस्थित असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या मनात अशी धास्ती निर्माण होऊ शकते की हावभाव किंवा अशी तयारी करणारी व्यक्ती फौजदारीपात्र बळाचा वापर करणार आहे. फौजदारीपात्र बलप्रयोग आणि हमल्याचे हे दोन्ही घटक पूर्णपणे अनुपस्थित आहेत. हमला आणि/किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग हे कलम ३५४ चे आवश्यक घटक असल्याने, आय. पी. सी. च्या कलम ३५४ अंतर्गत गुन्हा सिद्ध होत नाही. आय. पी. सी. च्या कलम ३५४ अंतर्गत गुन्हा केवळ तेव्हाच केला जातो जेव्हा एखाद्या महिलेवर तिचा

विनयभंग करण्याच्या हेतूने हमला केला जातो किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केला जातो.

०९. आमचे असे मत आहे की आय. पी. सी. च्या कलम ३५४ अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी अर्जदारांविरुद्ध (आरोपी क्रमांक २ आणि ३ ) आरोप निश्चित करण्यात विद्वान ए. सी. जे. एम यांनी पूर्णपणे चूक केली आहे.

१०. विद्वान ए. सी. जे. एम यांनी निश्चित केलेला दुसरा आरोप आय. पी. सी. च्या कलम ३५४ सी अंतर्गत आहे. हा आरोप केवळ आरोपी क्रमांक १ च्या विरोधात निश्चित करण्यात आला आहे. कलम ३५४ सी च्या स्पष्टीकरण १ च्या अर्थांतर्गत खाजगी कृत्यात गुंतलेल्या उत्तरवादी क्रमांक २ ची व्हिडिओ क्लिप त्याने रेकॉर्ड केली होती या आधारावर आरोप निश्चित करण्यात आला आहे. आक्षेपित व्हिडिओ क्लिपचा प्रसार करणे देखील कलम ३५४ सी अंतर्गत दंडनीय गुन्हा असेल. विद्यमान अर्जदार/आरोपी क्रमांक २ आणि ३ यांच्याविरोधातील आरोप असा आहे की त्यांनी आरोपी क्रमांक १ ने रेकॉर्ड केलेली उक्त व्हिडिओ क्लिप प्रसारित केली आहे. त्यामुळे हे स्पष्ट आहे की आयपीसीच्या कलम ३५४सी अंतर्गत विद्यमान अर्जदार/आरोपी क्रमांक २ आणि ३ यांच्याविरोधातही आरोप निश्चित व्हायला हवे होते.

११. आमचे असेही मत आहे की आय. टी. अधिनियम २००० चे कलम ६६ -ई देखील लागू केले जाऊ शकते. आय. टी. अधिनियमाच्या कलम ६७ -ई चे आय. पी. सी. च्या

कलम ३५४-सी याच्याशी जवळचे साम्य आहे. कलम ३५४-सी हे खाजगी कृत्यात गुंतलेल्या महिलेचे अभिलेखन आणि प्रसार करण्याशी संबंधित आहे, तर कलम ६६ -ई हे कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी क्षेत्राची प्रतिमा त्याच्या किंवा तिच्या संमतीशिवाय अभिलेखन आणि/किंवा प्रसारित करण्याशी संबंधित आहे. जेव्हा एखाद्या महिलेविरुद्ध चूकचे केले जाते तेव्हाच कलम ३५४ -सी लागू होते. जेव्हा एखाद्या पुरुष किंवा महिलेविरुद्ध चुकीचे केले जाते तेव्हा आयटी अधिनियमाचे कलम ६६ -ई लागू होते. कलम ३५४ सी 'खाजगी कृत्य ' याबद्दल बोलते जे उघड झालेले किंवा कपड्यांखाली झाकलेले महिलेचे मागील किंवा छाती गुप्तांग उघडकीस आणू शकते. कलम ६६ -ई म्हणजे पुरुष किंवा स्त्रीचे ' गुप्तांग ', जे उघडकीस आणण्यात आले किंवा कपड्यांखाली झाकलेले असलेले . 'गुप्तांग' या शब्दाचा अर्थ गुप्तांग, स्त्रीचे मागचे भाग किंवा स्तन असा होतो. आय. पी. सी. च्या कलम ३५४ -सी अंतर्गत आरोप निश्चित केले जात असल्याने, कलम ६६-ई अंतर्गत आरोपही निश्चित करणे आवश्यक असू शकते. आय. पी. सी. च्या ३५४-सी आणि आय. टी. अधिनियमाच्या ६६ -ई मधील वेगळे वैशिष्ट्य म्हणजे ३५४-सी केवळ महिलांविरुद्ध लागू केले जाते तर आय. टी. अधिनियमाचे कलम ६६ -ई पुरुष आणि महिला दोघांनाही लागू होते. त्याचप्रमाणे, कलम ३५४-सी खाजगी कृत्य याबद्दल बोलते आणि ६६ -ई 'गुप्तांग ' याबद्दल बोलते.

आय. टी. अधिनियमाच्या ६६ -ई लागू होत आहे की नाही याचा विद्वान दंडाधिकारी यांनी विचार केला पाहिजे.

१२. वरील गोष्टींव्यतिरिक्त, माहिती तंत्रज्ञान अधिनियम , २००० चे कलम ६७ (यापुढे संक्षिप्ततेसाठी 'आयटी अधिनियम' म्हणून संदर्भित) देखील लागू झाल्याचे दिसते. आय. टी. अधिनियमाचे कलम ६७ हे आय. पी. सी. च्या कलम २९२ शी समानार्थक आहे, तर कलम २९२ हे पुस्तक, पत्रके, कागद इत्यादींच्या विक्री, वितरण किंवा सार्वजनिक प्रदर्शनाशी संबंधित गुन्ह्याशी संबंधित आहे, जे कामुक आहे किंवा लैंगिक बाबतीत फाजील आहे . आय. टी. अधिनियमाचे कलम ६७ त्या संदर्भात कामुक साहित्य किंवा सामग्रीच्या प्रसारणाशी संबंधित आहे जी लैंगिक बाबतीत फाजील आहे किंवा नीतिभ्रष्ट आणि भ्रष्ट लोकांचा जे ते इलेक्ट्रॉनिक स्वरूपात वाचू किंवा पाहू शकतात त्याकडे कल असतो .

१३ . अभिलेखावरील दस्तऐवज असे सूचित करते की उत्तरवादी क्रमांक २ आणि तिचा पती पती-पत्नी म्हणून जवळीक साधणार होते तेव्हा व्हिडिओ क्लिप आरोपी क्रमांक १ ने रेकॉर्ड केली होती. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात अशी सामग्री पाहणे हे कामुक मानले जाऊ शकते किंवा अशा सामग्रीला लैंगिक बाबतीत फाजील मानले जाऊ शकते किंवा ते पाहणाऱ्या नीतिभ्रष्ट आणि भ्रष्ट लोकांचा त्याकडे कल असू शकतो.

१४. आय. टी. अधिनियम , २००० चे कलम ६७ हे या अधिनियमाच्या कलम ७७ -बी च्या दृष्टीने दखलपात्र गुन्हा आहे. तपासादरम्यान अर्जदार क्रमांक २ याचा मोबाईल फोन आणि ज्या मेमरी कार्डमध्ये आरोपी क्रमांक १ मोहम्मद सारोवर याने ध्वनिमुद्रण सेव केले होते ते जप्त करण्यात आले आहे. कामुक असल्यामुळे किंवा लैंगिक बाबतीत फाजील असल्याने किंवा त्याला पाहणाऱ्या नीतीभ्रष्ट आणि भ्रष्ट व्यक्तीचा त्याकडे कल होता आहे की नाही हे शोधण्यासाठी उक्त व्हिडिओ क्लिप पाहिली पाहिजे.

१५ . साधारणपणे जेव्हा अर्जदार आमच्यासमोर आले , तेव्हा आम्ही असा कोणताही आदेश दिला नसता जो ते या न्यायालयात गेले नसते त्यापेक्षा अधिक गैरसोयीचा असता. तथापि, अर्जदारांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत या न्यायालयात धाव घेतली आहे. ही तरतूद एक हितकारी तरतूद आहे, जी संपूर्ण न्याय देण्यासाठी उच्च न्यायालयाचे अंतर्निहित अधिकार जपून ठेवते. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ च्या उद्दिष्टांपैकी एक म्हणजे कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर रोखणे तसेच न्यायच्युति होणे रोखणे हा होय. आमचे असे मत आहे की तपास यंत्रणा, विद्वान न्यायचौकशी न्यायालयासमोर हजर असलेले विद्वान सरकारी वकील तसेच विद्वान दंडाधिकारी च्या यांच्या सामूहिक अपयशामुळे, कायद्याच्या ज्या तरतुदी लागू झाल्याचे दिसते त्याचे सर्व संबंधितांचे लक्ष वेधून घेणे सुटले आहे आणि त्यामुळे सध्याच्या प्रकरणात त्या लागू केल्या गेल्या नाही. अशा स्थितित , आमचे असे मत आहे की

आम्ही डोळेझाक करू नये आणि परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक ते केले पाहिजे. माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६ -ई आणि ६७ यासह आय. पी. सी. च्या कलम ३५४ सी अंतर्गत अर्जदारांविरुद्ध आरोप निश्चित केले जाऊ शकतात का यावर विचार करण्याच्या दृष्टीने नांदेडच्या ५ व्या अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी यांना या प्रकरणाचा फेरविचार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

१६ . कोणत्याही फौजदारी खटल्यात आरोप निश्चित करणे हा अतिशय महत्त्वाचा टप्पा असतो. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या अठराव्या प्रकरणाच्या तरतुदी आरोपांच्या प्रकारांशी संबंधित आहेत. गुन्ह्याचे संक्षिप्त वर्णन, कायद्याच्या तरतुदी आणि गुन्ह्याचे विशिष्ट नाव असल्यास, त्यासांगून आरोप निश्चित करावे लागतील. गुन्हा करण्याची तारीख, वेळ आणि ठिकाण आणि पद्धत नमूद करणे आवश्यक आहे. ज्या व्यक्तींविरोधात आरोप निश्चित केले जात आहेत, त्यांची नावे सांगणे आवश्यक आहे. आरोप अशा प्रकारे निश्चित केला गेला पाहिजे की ज्यामुळे आरोपीला त्याच्यावर लावलेल्या आरोपांच्या अचूक स्वरूपाची पुरेशी कल्पना मिळेल. दंड प्रक्रिया संहितेच्या कलम २१६ मध्ये अशी तरतूद आहे की न्यायनिर्णय अधिघोषीत करण्यापूर्वी न्यायालयाला दोषारोपात कोणताही फेरबदल करता येईल किंवा त्यात अधिक भर घालता येईल . तथापि, अशा अतिरिक्त दोषारोपाचे वा दोषारोपातील बदलाचे वाचन करणे आणि स्पष्टीकरण देणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. आरोपीला हानी पोहचते की

नाही यावर अवलंबून, न्यायालय एकतर मूळ दोषारोपासह बदललेला किंवा भर घातलेला दोषारोप निश्चित केला गेला आहे असे प्रकरण पुढे नेऊ शकते किंवा नव्याने खटला चालवण्याचे निर्देश देऊ शकते किंवा वाजवी कालावधीसाठी खटला पुढे ढकलू शकते.

१७. सध्याचे प्रकरण वॉरंट ट्रायलचे असेल. पोलिस अहवालाच्या आधारे सुरू करण्यात आलेल्या वॉरंट खटल्याची संपरीक्षा ही फौजदारी प्रक्रिया संहितेच्या XIX-ए या प्रकरणात दिली आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २३९ मध्ये अशी तरतूद आहे की दंडाधिकाऱ्यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७३ खालील पोलिस अहवालासह त्यांना पाठवलेल्या पोलिस अहवालाचा आणि कागदपत्रांचा विचार करणे आवश्यक आहे आणि अभियोग पक्षाला आणि आरोपीला सुनावणीची संधी दिल्यानंतर दंडाधिकाऱ्यांना जर आरोपींविरोधातील आरोप निराधार वाटत असेल तर ते आदेशात नोंदवलेल्या कारणांसाठी आरोपीला विनादोषारोप सोडण्याचा आदेश देतील. तथापि, पुराव्याचा विचार केल्यावर आणि पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, दंडाधिकाऱ्यांचे असे मत असेल की आरोपीने गुन्हा केला आहे असे गृहीत धरण्यासाठी वाजवी आधार आहे, तर ते आरोप निश्चित करतील, परंतु हे प्रकरण त्याच्या अधिकारक्षेत्रात यायला हवे .

१८ . आरोप निश्चित करण्याच्या टप्प्यावर आरोपीला एक मौल्यवान अधिकार प्रदान केला जातो. जर आरोप निराधार असेल तर त्याला त्वरित विनादोषारोप सोडण्याचा आदेश मिळण्याचा अधिकार आहे. अशा परिस्थितीत त्याला फौजदारी खटल्याची व्यथा सहन करावी लागणार नाही. त्याचप्रमाणे, अभियोग पक्षासाठी हे देखील आवश्यक आहे की आरोपींविरुद्ध योग्य दोषारोप तयार केले गेले पाहिजेत जेणेकरून खटल्याच्या पुढील टप्प्यात अनावश्यक गुंतागुंत उद्भवणार नाही. जरी आरोप तयार करण्यातील त्रुटी हा महत्वाचा दोष नसला, तरी आरोपी कोणत्याही परिणामी हानी किंवा न्यायाचे अपयश सिद्ध करू शकत असल्यास, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २१५ आणि ४६४ च्या दृष्टीने तो एक महत्वाचा दोष बनतो. अशी शक्यता टाळण्यासाठी, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४० अंतर्गत योग्य तरतुदी/कायद्यांतर्गत योग्य आणि निश्चित आरोप तयार करणे आवश्यक आहे. या संदर्भात, आम्ही, **२०२३ एस. सी. सी. ऑनलाईन (एस. सी.) ४२४** मध्ये नोंदवलेल्या **संदराजन विरुद्ध राज्य तर्फे निरीक्षक, पोलीस दक्षता लाचलुचपत प्रतिबंधक, डिंडीगुल** या प्रकरणातील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ देतो, ज्यामध्ये आरोप निश्चित करण्याच्या टप्प्याचे महत्त्व नमूद करताना, माननीय सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले आहे :

"१६ . आम्हाला आढळले आहे की, या प्रकरणात, दोषारोप अतिशय सहजपणे निश्चित केला गेला आहे. आरोप निश्चित करण्याच्या बाबतीत न्यायचौकशी न्यायालयांनी अतिशय सावधगिरी बाळगली पाहिजे. प्रस्तुत प्रकरणात, अशा कोणत्याही त्रुटी किंवा वगळण्यामुळे रिमांडच्या आदेशामुळे निर्दोष मुक्तता होऊ शकते आणि/किंवा खटल्याला बराच विलंब होऊ शकतो जो कलम ४६४ च्या पोट -कलम (२ ) अंतर्गत पारित केला जाऊ शकतो. न्यायचौकशी न्यायालयाच्या कर्तव्याव्यतिरिक्त, सरकारी वकिलालाही सतर्क राहणे हे कर्तव्य आहे आणि जर योग्य आरोप निश्चित केला गेला नाही तर योग्य आरोप निश्चित करण्यासाठी न्यायालयात अर्ज करणे हे त्याचे कर्तव्य आहे."

१९ . फौजदारी कारवाईत आरोप निश्चित करणे हा अतिशय महत्त्वाचा टप्पा असतो. आरोप निश्चित करून खटल्याची संपरीक्षा सुरू होते. सरकारी वकिलांचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि आरोपींच्या सुनावणीची संधी कायम ठेवल्यानंतरही आरोप निश्चित करावे लागतात. आरोपीला त्याच्या विरोधातील आरोपांची योग्य कल्पना देण्यासाठी योग्य आरोप निश्चित करणे आवश्यक आहे, ज्याला त्याला सामोरे जावे लागते. याव्यतिरिक्त, ज्याप्रमाणे योग्य आरोप निश्चित करण्यात अयशस्वी झाल्यास आरोपींबद्दल हानी पोहचू शकते, त्याचप्रमाणे एखाद्या गुन्ह्याच्या संदर्भात योग्य आरोप निश्चित करण्यात चूक केल्यास गुन्ह्यातील पीडित व्यक्तीला हानी पोहचेल आणि

त्यामुळे न्यायाचा उपहास होईल. खरे तर या प्रकरणाची दखल घेण्याच्या टप्प्यापासून, न्यायालयाने या प्रकरणात लागू होणाऱ्या कायद्याच्या विशिष्ट कलमांबद्दल सतर्क राहिले पाहिजे. विशेषतः आरोप निश्चित करण्याच्या टप्प्यावर, हे सुनिश्चित करणे न्यायालयाचे कर्तव्य आहे की सर्व लागू असलेल्या तरतुदींना योग्यरित्या लागू केले गेले आहे आणि त्यावर विचार केला गेला आहे आणि खटल्याच्या तथ्यांमध्ये लागू झालेल्या कायद्याच्या तरतुदींनुसार आरोप निश्चित केले गेले आहेत. तथापि, आरोप निश्चित करण्याशी संबंधित हा महत्त्वाचा टप्पा न्यायिक दृष्टिकोनाचा वापर न करता यांत्रिकरित्या पाळला जात आहे हे निरीक्षण नोंदविण्यास आम्ही भाग आहोत.

२०. सध्याच्या प्रकरणात, आम्हाला आढळले आहे की हा महत्त्वाचा टप्पा अगदी अनौपचारिक पद्धतीने हाताळला गेला आहे. विद्वान दंडाधिकाऱ्यांनी आय. पी. सी. च्या कलम ३५४ च्या संबंधात निर्देश दिले नाही आणि आवश्यक घटकांचे योग्य अवलोकन केले नाही आणि विद्यमान अर्जदार/आरोपी क्रमांक २ आणि ३ यांच्याविरुद्ध सद्याच्या तरतुदीनुसार चुकीचे आरोप निश्चित केले आहेत, जरी त्यांनी कोणत्याही फौजदारीपात्र बलप्रयोगाचा वापर केला नाही किंवा हमला करण्यासारखे कोणतेही कृत्य केले नाही हे निर्विवाद आहे. त्याचप्रमाणे, व्हिडिओ क्लिप रेकॉर्ड केल्याबद्दल आरोपी क्रमांक १ विरुद्ध आय. पी. सी. च्या कलम ३५४ -सी अंतर्गत आरोप निश्चित करताना, विद्यमान अर्जदार/आरोपी क्रमांक २ आणि ३ यांच्याविरुद्ध समान आरोप निश्चित करण्यात

आलेला नाही, ज्यांनी उक्त व्हिडिओ क्लिप प्रसारित केली आहे, जो देखील आय. पी. सी. च्या कलम ३५४ -सी अंतर्गत गुन्हा आहे. आम्हाला असेही आढळले आहे की कलम ६६ -ई आणि ६७ च्या तरतुदींकडे विद्वान दंडाधिकाऱ्यांचे लक्ष पूर्णपणे वगळले आहे.

२१ . तथापि, आम्ही हे देखील नोंदवले पाहिजे की, सर्व दंडाधिकाऱ्यांवर न्यायालयीन कामाचे ओझे किती आहे याची आपल्याला जाणीव आहे. आरोप निश्चित करण्याच्या टप्प्यासह फौजदारी कारवाईच्या सर्व टप्प्यांवर दंडाधिकाऱ्यांना योग्यरित्या मदत करणे हे विद्वान सरकारी वकिलांचे कर्तव्य आहे, तसेच आरोपींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्वान वकिलांचेही कर्तव्य आहे. बहुतेक प्रकरणांमध्ये, १७३ अहवालात नमूद केलेल्या गुन्ह्यांच्या संदर्भात विवेकबुद्धीचा वापर न करता यांत्रिकरित्या आरोप निश्चित केले जातात हे दुर्दैवी आहे. सध्याचे प्रकरण, दुर्दैवाने, आणखी एक असे प्रकरण आहे जिथे निश्चित केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर विवेकबुद्धीचा न केलेला वापर स्पष्ट आहे.

२२ . म्हणून आम्ही विद्वान दंडाधिकारी यांना वरील निरीक्षणांच्या प्रकाशझोतात पुन्हा एकदा आरोप निश्चित करण्याचे निर्देश देतो. आम्ही हे देखील स्पष्ट करतो की अभिलेखावरील साहित्य आणि कायद्याच्या तरतुदींच्या संदर्भात येथे केलेली निरीक्षणे ही प्रथमदर्शनी दंडाधिकारी यांना मार्गदर्शनासाठी केलेली निरीक्षणे आहेत. आरोपी व्यक्तींविरुद्ध कोणते आरोप निश्चित केले पाहिजेत आणि कायद्याच्या कोणत्या

तरतुदीनुसार हे ठरवण्यासाठी विद्वान दंडाधिकारी यांनी स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे. म्हणून, आम्ही खालील आदेश देतो.

**आदेश**

(I) ५ व्या अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी, नांदेड यांच्या अभिलेखावर प्रलंबित असलेल्या नियमित फौजदारी प्रकरण क्रमांक ६८१/२०२१ मध्ये दिनांक २४.०९.२०२१ रोजी प्रदर्श २० अन्वये निश्चित केलेला दोषारोप याद्वारे रद्दबातल केला जातो.

(II) ५ व्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नांदेड यांना वरील निरीक्षणांच्या प्रकाशझोतात कायद्यानुसार मुक्त करण्यासाठी /आरोप निश्चित करण्याचा विचार करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २३९ आणि २४० च्या टप्प्यापासून या प्रकरणाचा फेरविचार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**(रोहित. डब्ल्यू. जोशी, न्या. )** **(श्रीमती . विभा कंकणवाडी न्या. )**

## अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."